(1)

# मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या २१ व्या सभेचे कार्यवृत्त.

दिनांक : २८ जुलै, १९८०.

वेळ : ११.३० वाजता. (सकाळी)

सभास्थान : सभागृह, ३रा मजला,
गृहनिर्माण भवन, वांद्रे(पूर्व)
मुंबई : ४०० ०५१.

सभेला उपस्थित असलेल्या सदस्यांची आणि निमंत्रितांची यादी जोडपत्र 'अ' मध्ये देण्यात आली आहे.

महानगर आयुक्तांनी मंत्री, सदस्य आणि निमंत्रितांचे स्वागत केले.

आपल्या उद्‌घाटनाच्या भाषणामध्ये बीएम्आर्डीएच्या मंत्र्यांनी प्राधिकरणाचे धोरण व प्राधिकरणाच्या कार्याविषयी आपली मते व दृष्टीकोन विशद करुन सांगितला आणि सदस्यांनी त्यांच्या पुढे ठेवण्यात आलेल्या कार्यक्रमाविषयी व अर्थसंकल्पाविषयी विधायक सूचना करावी अशी त्यांनी विनंती केली. (मंत्र्यांच्या भाषणाची प्रत जोडपत्र 'ब' म्हणून जोडली आहे)

## बाब क्र. १ : बीएम्आर्डीएच्या या पूर्वीच्या (२० व्या) सभेच्या कार्यवृत्तास पुष्टी देणे.

बाब क्र.५ ला अनुलक्षून श्री.अमरनाथ पाटील यांनी वांद्रे-कुर्ला प्रकल्पाच्या संदर्भात कांही मुद्दे उपस्थित केले. सभागृहापुढे जेव्हा बाबी क्र.५ व ८ विचारार्थ येतील त्यावेळी ह्या मुद्यावर ऊहापोह करावा अशी सूचना महानगर आयुक्तांनी केली.

त्यानंतर कार्यवृत्तास पुष्टी देण्यात आली.

## बाब क्र.२ : बीएम्आर्डीएच्या या पूर्वीच्या (२० व्या) सभेच्या कार्यवृत्ताचा कार्यवाही विषयक अहवाल.

मागील सभेमध्ये कर्मचाऱ्यांच्या भविष्य निर्वाह निधी विषयी विचारण्यात आलेल्या प्रश्नाविषयी श्री.कोपर्डे यांनी चौकशी केली. ह्या प्रश्नांचा विचार विनिमय करण्यासाठी आपल्या स्वतःच्या अध्यक्षतेखाली एक अनौपचारिक समिती आपण नेमली आहे असे महानगर आयुक्तांनी सांगितले व हा प्रश्न सहानुभूतीपूर्वक व जलद सोडविण्यात येईल असे आश्वासन त्यांनी सभागृहाला दिले.

ट्रक टर्मिनलच्या जमिनीविषयी महानगर आयुक्तांनी असे सांगितले की, जमीन संपादन करुन तिचा ताबा घेण्याबाबत बरीच प्रगति झाली असून बॉम्बे पोर्ट ट्रस्टचा जमिनीविषयीचा प्रश्न बॉम्बे पोर्ट ट्रस्टच्या अध्यक्षांच्या शक्यतो सल्याने आणि सलोख्याने सोडविण्यात येईल असे स्पष्ट केले.

बाब क्र.३.....२/-

बाब क्र. ३ : १९८०-८१ या वार्षिक कार्यक्रम.

महानगर उप आयुक्तांनी वार्षिक कार्यक्रम विशद करुन सांगितला.

मुंबई महानगरपालिकेच्या सुधार समितीचे सभापती श्री.ठाणेकर यांनी असे प्रतिपादन केले की, झोपडपट्ट्या फार वेगाने वाढत असून त्यामुळे वांद्रे-कुर्ला समूहासारखे काही प्रकल्प कार्यवाही साठी हाती घेण्यापूर्वीच निष्फळ ठरतील.

श्री.बाबुराव शेटे (महापौर आणि उपाध्यक्ष) यांनी असे प्रतिपादन केले की प्राधिकरणाच्या कार्यात वार्षिक कार्यक्रमाने फारशी प्रगती दाखविली नाही. प्राधिकरणाने अनेक अभ्यास हाती घेतले असून त्यापैकी बहुतेक अभ्यास वर्षानुवर्ष चालू आहेत. या संदर्भात त्यांनी विशेषत: प्रादेशिक गृहनिर्माण विषयक धोरण, मत्स्यव्यवसाय, न्हावा-शेवा, कार्यालय स्थल निश्चिती धोरण व ग्रामीण विकास या अभ्यासांचा उल्लेख केला.

महानगर आयुक्तांनी चर्चेत भाग घेऊन असा खुलासा केला की नियोजन व समन्वय करणे व प्रकल्प आखणे हे प्राधिकरणाचे प्रमुख कार्य असून घरबांधणीबाबत प्राधिकरणाने गृहनिर्माण विषयक व आवश्यक असलेल्या घरांची संख्या दिली आहे. त्यांनी पुढे असेही सांगितले की, गृहनिर्माण धोरणाची प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्याचे काम महाराष्ट्र गृहनिर्माण आणि क्षेत्र विकास मंडळाचे असून ते प्राधिकरणाचे काम नाही. कार्यालय स्थल निश्चिती धोरण, कार्यालयांच्या वेगवेगळ्या वेळा ठेवणे याबाबत काही गैरसमज झाला असल्याचे महानगर आयुक्तांनी सांगितले. त्यांनी पुढे असेही सांगितले की, हे अभ्यास केवळ प्राधिकरणाच्या कार्यालयासाठी नसून मुंबईतील सर्व कार्यालयांसाठी आहेत.

श्री.धारप यांनी प्राधिकरणावर लोकनियुक्त सदस्यांच्या सुमारे १० जागा रिकाम्या असतांना वार्षिक कार्यक्रम व अर्थसंकल्प संमत करण्यास ही सभा सक्षम आहे काय असा प्रश्न उपस्थित केला. महानगर आयुक्तांनी असे निदर्शनास आणून दिले की, राष्ट्रपतींच्या राजवटीमुळे काही कायदेशीर अडचणी निर्माण झाल्याकारणाने डिसेंबर १९७९ नंतर प्राधिकरणाची सभा होऊ शकली नाही; या अडचणी सदस्यांना विशद करुन सांगण्यात आल्या आहेत. म्हणून आपण सदस्यांकडे तसा प्रस्ताव पाठवून जुलै अखेरपर्यन्त खर्चाला मान्यता मिळविली होती. ह्या प्रस्तावास एक सदस्य सोडून प्राधिकरणाच्या इतर सर्व सदस्यांनी मान्यता दिली होती. म्हणून संपूर्ण वर्षासाठी अर्थसंकल्प संमत करण्यासाठी व ३१.७.१९८० नंतर खर्च करण्याचा अधिकार देण्यासाठी प्राधिकरणाची बैठक अत्यावश्यक आहे असे महानगर आयुक्तांनी सांगितले.

प्राधिकरणावरील रिक्त जागाविषयी महानगर आयुक्तांनी असे प्रतिपादन केले की कलम ४अ अन्वये प्राधिकरणामध्ये रिक्त जागा असली तरी त्यामुळे प्राधिकरणाच्या कामकाजास बाधा येत नाही. या गोष्टीस विधी सल्लागारांनी दुजोरा दिला आहे. तथापि, लोकनियुक्त सदस्यांच्या इतक्या जागा रिकाम्या असतांना सभा घेणे हे आपणासही समाधान देत नाही असे महानगर आयुक्तांनी सांगितले. विशेषतः विधि सल्लागारांनी अशी सभा संपूर्णपणे वैध असल्याचा निर्वाळा दिला असतांना ३१ जुलै १९८० पूर्वी अर्थसंकल्प संमत करुन घेणे आवश्यक असल्यामुळे आपल्यापुढे अन्य पर्यायच नव्हता. महानगर आयुक्तांनी असेही सांगितले की वार्षिक कार्यक्रमास व अर्थसंकल्पास मान्यता मिळाली नाही तर प्राधिकरणाचे कार्य थांबवेल. व त्यामुळे विशेषतः ट्रक टर्मिनलच्या व वांद्रे-कुर्ला समूहाच्या कार्यक्रमावर गंभीर परिणाम होईल कारण ट्रक-टर्मिनलचे व वांद्रे-कुर्ला समूहाचे काम नजीकच्या भविष्य काळात सुरु होईल अशी अपेक्षा आहे.

म्हणून सभेने वार्षिक कार्यक्रमास व अर्थसंकल्पास मान्यता द्यावी अशी सूचना महानगर आयुक्तांनी केली. आपण लवकरच दुसरी सभा बोलावू असे आश्वासन महानगर आयुक्तांनी दिले. या सभेला नव्याने निवडून आलेले सदस्य उपस्थित असतील व तेथे वार्षिक कार्यक्रम, अर्थसंकल्प व पूरक अर्थ-संकल्प सादर करण्यात येतील असे त्यांनी सांगितले. शिवाय प्रत्येक योजनेचा रीतसर प्रगति अहवालही आपण सादर करु असेही त्यांनी सांगितले.

त्यानंतर सभेने वार्षिक कार्यक्रमास व १९८०-८१ च्या अर्थ-संकल्पास (बाब क्र.४) मान्यता दिली आणि खालील ठराव संमत केले.

ठराव क्र. १७३ :

असा ठराव करण्यात येत आहे की,

अ) कार्यसूची टिप्पणीस जोडलेल्या जोडपत्र १ मध्ये वर्णिलेल्या १९८०-८१ च्या वार्षिक कार्यक्रमास मान्यता देण्यात येत आहे,

ब) वार्षिक कार्यक्रमांत समाविष्ट करण्यात आलेल्या योजनांच्या तपशीलास मान्यता देण्यास स्थायी समितीस याद्वारा अधिकार देण्यात येत आहे.

ठराव क्र.१७४ :

असा ठराव करण्यात येत आहे की, दिनांक २९.२.१९८० रोजी प्राधिकरणाच्या सदस्यांना पाठविण्यांत आलेल्या खालील ठरावांत घेण्यात आलेल्या निर्णयाचे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (सभेचे कामकाज

चालविणे) विनियम १९७५ मधील विनिमय ९ यास अनुसरुन प्राधिकरण याव्दारा अनुसमर्थन देत आहे.

असा ठराव करण्यात येत आहे की,१९८०-८१ च्या अर्थसंकल्पीय अंदाजास प्राधिकरणाची मान्यता मिळेल अशा अपेक्षेने मंजूर झालेली पदे,चालू योजना आणि प्राधिकरणाच्या दैनंदिन प्रशासनावर मुंबई महानगर प्रदेश विकास निधीतून खर्च करण्यास प्राधिकरण याव्दारा (दिनांक १ एप्रिल,१९८० ते ३१ जुलै १९८० हे दोन्ही दिवस धरुन चार महिन्याच्या कालावधीकरिता ) महानगर आयुक्तांस अधिकार देत आहे.

पुढे असा ठराव करण्यात येत आहे की,महानगर प्राधिकरणाची अंदाजित जमा आणि संवितरण दर्शविणारे वित्तीय वर्ष १९८०-८१ चे वार्षिक अर्थसंकल्पीय अंदाज आणि १९७९-८० चे सुधारित अंदाज यास सन १९७४ च्या मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियमाचे कलम २३ (१) अन्वये मान्यता देण्यात येत आहे.

पुढे असा ठराव करण्यात येत आहे की,प्रत्येकी १० लाख रुपयांहून अधिक खर्च नसलेल्या योजना,सर्वेक्षणे इ. मंजूर करण्यास व ज्यासाठी मान्यताप्राप्त अर्थसंकल्पात तरतूद केली नसेल अशा बाबतीत त्याच मर्यादेहून अधिक नाही इतका खर्च ही प्रकरणे त्यानंतरच्या प्राधिकरणाच्या पहिल्या सभेत प्रतिवेदित करण्यात येतील या अटीवर, करण्यास मान्यता देण्यास प्राधिकरण याव्दारा स्थायी समितीस अधिकार प्रदान करीत आहे.

पुढे असा ठराव करण्यात येत आहे की,अर्थसंकल्पाच्या आस्थापना अनुसूचीत समाविष्ट न करण्यात आलेली पदे निर्माण करण्याचा अधिकार,अशी पदे निर्माण करण्यास सक्षम असलेल्या अधिकाऱ्यास देण्यात येत आहे. मात्र अशा पदांवरील खर्च हा अर्थसंकल्पात पगार आणि भत्ते यासाठी करण्यात आलेल्या एकूण तरतुदीतून करता आला पाहिजे.

बाब क्र. ५ : वांद्रे-कुर्ला समूहाबाबत नियोजन प्रस्ताव आणि सर्वसाधारण टिप्पणी.

बाब क्र. ६ : कलम १३ खालील अधिसूचनेत फेरबदल (वांद्रे-कुर्ला - समूहाचे अधिसूचित क्षेत्र )

(मागील सभेमध्ये लांबणीवर टाकण्यात आलेली बाब क्र.५)

बाब क्र. ७ : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियमाचे कलम १३ खालील अधिसूचनेची मुदतवाढ.

बाब क्र.८ ........५/-

जोडपत्र - 'अ'

## मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची २१ वी सभा

### उपस्थित सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्रीमती प्रमिलाबेन बी.याज्ञिक<br>मंत्री, बीएम्आर्डीए. | अध्यक्ष |
| २) | श्री.चंद्रकांत त्रिपाठी,<br>राज्यमंत्री, बीएम्आर्डीए. | उपाध्यक्ष |
| ३) | श्री.बाबुराव शेटे,<br>मुंबईचे महापौर | उपाध्यक्ष |
| ४) | श्रीमती ताराबाई वर्तक,<br>राज्यमंत्री, अध्यक्ष, जिल्हा नियोजन<br>आणि विकास मंडळ, ठाणे. | सदस्य |
| ५) | श्री.प्रभाकर पाटील,<br>अध्यक्ष, कुलाबा जिल्हा परिषद | " |
| ६) | श्री.विनायक धारप,<br>अध्यक्ष, स्थायी समिती,<br>मुंबई महानगरपालिका | " |
| ७) | श्री.कमलाकर भास्कर ठाणेकर,<br>अध्यक्ष, सुधार समिती,<br>मुंबई महानगरपालिका | " |
| ८) | श्री.एम्.एच्.बेदी,<br>अध्यक्ष, बीईएस्टी समिती<br>मुंबई महानगरपालिका | " |
| ९) | श्री.रामानंद लाड,<br>मुंबई महानगरपालिका सदस्य | " |
| १०) | श्री.एकनाथ कोपर्डे,<br>मुंबई महानगरपालिका सदस्य | " |
| ११) | श्री.बी.डी.झुटे,<br>मुंबई महानगरपालिका सदस्य | " |
| १२) | श्री.अमरनाथ पाटील,<br>मुंबई महानगरपालिका सदस्य | " |
| १३) | श्री.छगन भुजबळ,<br>मुंबई महानगरपालिका सदस्य | " |

१४).......२/-

१४) श्री.अली महमंद उमर मेमन, "
मुंबई महानगरपालिका सदस्य

१५) श्री.श्रीपाद वामन पटवारी, "
अध्यक्ष, डोंबिवली नगरपालिका परिषद,

१६) श्री.डी.के.खानविलकर, "
अध्यक्ष, अलिबाग नगरपालिका परिषद

१७) श्री.अनंत नारायण ठाकूर, "
अध्यक्ष, पंचायत समिती, उरण

१८) श्री.महेश्वर मंजूनाथ वागळे, "
महाव्यवस्थापक, मुंबई दूरध्वनी विभाग

१९) श्री.बोरी गोपाळकृष्ण मूर्ती "
सभापती, जलसंपत्ती व्यवस्थापन मंडळ

२०) श्री.माधव श्री.पळनिटकर, "
महानगर आयुक्त

निमंत्रित :

सचिव, महाराष्ट्र शासन
नगर विकास, मंत्रालय.

---------

हो: १८८८०.

# MINUTES OF THE TWENTY-FIRST MEETING OF THE B.M.R.D.A.

DATE : 28th July, 1980.

TIME : 11.30 A.M.

PLACE : Meeting Hall, 3rd Floor,
Griha Nirman Bhavan,
Bandra(East),
BOMBAY : 400 051.

A list of Members and Invitees present is given in annexure 'A'.

The Metropolitan Commissioner welcomed the Ministers, Members and Invitees.

The Minister BMRDA in her inaugural speech outlined the policy of the BMRDA and her views and approach to the work of the BMRDA and invited Members to make constructive suggestions about the works programme and the budget placed before them. (A copy of the Minister's speech is enclosed as annexure 'B').

Item No. 1 : Confirmation of the Minutes of the last (20th) Meeting of the BMRDA.

With reference to item No.5, Shri Amarnath Patil raised certain points about the Bandra-Kurla Project. The Metropolitan Commissioner suggested that this may be discussed when the meeting takes up items Nos. 5 and 6.

Thereafter, the minutes were confirmed.

Item No. 2 : Action taken report of the Minutes of the last (20th) Meeting of the BMRDA.

Shri Koparde enquired about the question raised in the last meeting about the employees' provident fund. The Metropolitan Commissioner explained that he had appointed an informal Committee under his own Chairmanship to examine this question and assured the meeting that this problem would be solved as sympathetically and expeditiously as possible.

About the truck terminal land, the Metropolitan Commissioner explained that considerable progress had been made about taking possession of these lands and that any problem vis-a-vis the Port Trust would be solved amicably in consultation with the Chairman of the B.P.T.

Item No. 3 :.....

Item No. 3 : Annual Work Programme 1980-81.

The Dy. Metropolitan Commissioner explained the Work Programme.

Shri Thanekar, Chairman, Improvements Committee, BMC, observed that slums have been growing very fast and some of the projects like the Bandra-Kurla Complex would be frustrated before they are taken up for execution.

Shri Baburao Shete (Mayor and Vice-Chairman) observed that the Work Programme did not show much progress in the work of the BMRDA. There were too many studies, many of which were being continued from year to year.

In particular, he referred to the studies of Regional Housing Policy, Fisheries, Nhava-Sheva, Office Location Policy and Village Development.

Intervening in the discussion, the Metropolitan Commissioner explained that our principal function was planning co-ordination and project formulation. In regard to Housing, we had indicated the Housing Policy and the volume of housing required, but the actual execution of the Housing Policy was the function of the MHADA and not the BMRDA. The Metropolitan Commissioner also pointed out that there was some misunderstanding about the studies in respect of the Office Location Policy and the Staggering of Office Hours. These studies were not meant for the office of the BMRDA but for all the offices in Bombay.

Shri Dharap raised the question whether with about 10 vacancies of elected members, the meeting was competent to pass the Work Programme and the Budget. The Metropolitan Commissioner pointed out that because of certain legal difficulties arising out of the Presidents Rule which had been explained to the Members, no meeting of the Authority could be held since December, 1979 and, therefore, we had obtained a vote on account for expenditure upto the end of July by the circulation of a proposal to that effect, which has been approved by all the Members of the Authority except one. Therefore, a meeting of the Authority to pass the budget for the full year and authorise expenditure beyond 31.7.1980 was absolutely essential.

About the vacancies on the Authority, the Metropolitan Commissioner pointed out that according to

Section 4A...

(11)

Section 4A, the existance of a vacancy on the Authority does not vitiate the proceedings of the Authority. He had also got this confirmed from the Legal Adviser. The Metropolitan Commissioner, however, explained that he himself was not very happy about the meeting being held with so many vacancies of elected members, but that in view of the necessity of getting the budget passed before the 31st July, 1980, we had no other alternative, especially as the L.A. has confirmed that such a meeting is perfectly legal. The Metropolitan Commissioner pointed out that if the Work Programme and the Budget were not approved, the work of the BMRDA would come to a standstill and it would seriously affect the Work Programme particularly the truck terminal and the Bandra-Kurla Complex where execution work was expected to start in the near future.

The Metropolitan Commissioner, therefore, suggested that the meeting should approve the Work Programme and the Budget but that he would convene another meeting shortly at which the newly elected members would be present and at which the work Programme and the Budget together with a supplementary budget would be presented. He would also give a proper progress report in respect of each scheme.

The meeting thereafter approved the Work Programme and the Budget for 1980-81 (Item No.4) and passed the following Resolutions :-

RESOLUTION NO. 173 :

Resolved that (a) the Annual Work Programme for 1980-81 as outlined in the Annexure-I to the Agenda Note is approved and (b) the Standing Committee is hereby authorised to accord approval to the details of the schemes included in the Annual Work Programme.

RESOLUTION NO. 174 :

Resolved that the Authority, in pursuance of Regulation 9 of the BMRDA (Conduct of Business at Meetings) Regulations, 1975 hereby ratifies the

decision ....

decision taken in the following Resolution, circulated to the Members of the Authority on 29.2.1980.

Resolved that the Authority authorises the Metropolitan Commissioner (for a period of four months from 1st April, 1980 to 31st July, 1980, both days inclusive) to incur expenditure on sanctioned posts, continuing schemes and on daily administration of the Authority's business, from the Bombay Metropolitan Region Development Fund in anticipation of the approval of the Authority to the Budget Estimates for 1980-81.

Resolved further that the Annual Budget Estimates in respect of the financial year 1980-81 and the Revised Estimates for 1979-80 showing estimated receipts and disbursements of the Metropolitan Authority, are approved under Section 23(1) of the BMRDA Act, 1974.

Resolved further that the Authority do and hereby delegate the power to the Standing Committee to sanction schemes, surveys, etc. estimated to cost not more than Rs.10 lakhs in each case and to authorise the incurring of any expenditure not exceeding the same limit, in respect of which provision has not been made in the approved budget, subject to a report of such cases being made to the Authority at the next meeting.

Resolved further that the authorities competent to sanction the creation of posts are authorised to create posts, which are not included in the establishment schedule to the budget; provided that the expenditure on such posts can be met from the total provision for salaries and allowances to the st f made in the budget.

Item No. 5 : Planning proposals and general note on Bandra-Kurla Complex.

Item No. 6 : Modification to Section 13 Notification (Notified Area of Bandra-Kurla Complex) (Deferred Item No.5 of the last meeting.)

Item No. 7 : Extension of Notification under Section 13 of the BMRDA Act, 1974.

Item No. 8 : Accounts of the Authority for the year 1979-80 and Report of the Financial Adviser thereon.

Item No. 9 : Annual Report of BMRDA 1978-79.

The consideration of the above items on the agenda was postponed for the next meeting.

---------------

Annexure 'A'...

Annexure 'A'

MEMBERS PRESENT :-

Smt. P.B. Yagnik, - Chairman.
Minister for BMRDA.

Shri Chandrakant Tripathi, - Vice-Chairman.
Minister of State for
BMRDA.

Shri B.H. Shete, - Vice-Chairman.
Mayor of Bombay.

Smt. Tarabai Vartak, - Member.
Minister of State &
Chairman DPDC, Thane.

Shri P.N. Patil, - Member.
President,
Kulaba Zilla Parishad.

Shri V.G. Dharap, - Member.
Chairman,
Standing Committee, BMC.

Shri K.B. Thanekar, - Member.
Chairman,
Improvements Committee,
BMC.

Shri M.H. Bedi, - Member.
Chairm[illegible]
BEST Co[illegible]tee, BMC.

Shri R.P. Laud, - Member.
Councillor, BMC.

Shri E.R. Koparde, - Member.
Councillor, BMC.

Shri B.D. Zute, - Member.
Councillor, BMC.

Shri.....

Shri A.W. Patil, - Member.
Councillor, BMC.

Shri C.C. Bhujbal, - Member.
Councillor, BMC.

Shri A.U. Memon, - Member.
Councillor, BMC.

Shri S.W. Patwari, - Member.
President, Dombivli,
Municipal Council.

Shri D.K. Khanvilkar, - Member.
President,
Alibag Municipal Council.

Shri A.N. Thakur, - Member.
Chairman,
Uran Panchayet Samiti.

Shri M.M. Wagle, - Member.
General Manager,
Bombay Telephones.

Shri N.G.K. Murti, - Member.
Chairman, WRM Board,
BMRDA.

Shri M.S. Palnitkar, - Member-Secretary.
Metropolitan Commissioner.

<u>INVITEES</u> :

1) Secretary to Government,
Urban Developm t,
Mantralaya.

JJJJJJJJ

Annexure'B'(Marathi)